
# जन्मजात मुक्त




# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

फेब्रुवारी २०२५

वर्ष ५० अंक ०२



श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

व्यक्तीने स्वतःची चेतना अगदी सहजतेने ऊर्ध्वमुख करत, खुली केली पाहिजे आणि ती सत्याच्या स्पंदनांनी भरून घेतली पाहिजे. त्या चेतनेचा इथल्या गोष्टींशी मेळ घातला पाहिजे. वरती अगदी शाश्वत काळापासून सुसंवाद अस्तित्वात आहेच, तो सुसंवाद इथे, या पृथ्वीवरदेखील निर्माण केला पाहिजे.

– श्रीमाताजी (Conversation with a Disciple, April 5, 1967)

*

# जन्मजात मुक्त

संपादकीय.............................................................०२
ज्योतीचा जन्म व विकास.................................................०३
काही आठवणी.......................................................३०

---

## संपादकीय

दिव्य मातेची म्हणजे श्रीमाताजींची जीवनकहाणी ही केवळ त्यांचीच कहाणी नसून, ती पृथ्वीवर आजवर न उलगडलेल्या भावी काळाची कहाणी आहे.

वास्तविक, आद्य शक्ती हे श्रीमाताजींचे मूळ स्वरूप, पण पृथ्वीवासीयांच्या उत्क्रांतीसाठी, त्या देह धारण करून आपल्यामध्ये अवतरल्या. अशा अवतारी व्यक्तींना येथे कार्य करत असताना येथील मर्यादांमध्ये राहूनच जीवनव्यवहार करावा लागतो, हे आपल्याला माहीत आहे. आणि त्यामुळेच त्यांना आपल्या मूळ स्वरूपाची सातत्याने कितीही जाणीव असली तरी त्यांनाही जन्म, बालपण, शिक्षण, तारुण्य, जीवनातील चढउतार, संघर्ष या सर्व लौकिक गोष्टींमधून जावेच लागते. किंबहुना, सामान्य जिवांपेक्षा त्यांचा संघर्ष अधिकच बिकट असतो, असे आपल्याला आढळते. श्रीमाताजींची जीवनकहाणी तेच दर्शविते.

ही कहाणी वाचत असताना, आपल्या आंतरिक अस्तित्वातील एक कवाड खुले होते आणि श्रीमाताजींच्या दिव्य व्यक्तिमत्त्वामधील एखाद्या पैलूशी आपला क्षणकाळासाठी का होईना, पण संपर्क घडतो. हा संपर्क नेहमीच ताजेतवाना करणारा, पुनरुज्जीवित करणारा असतो.

'अभीप्सा' मासिकाचा फेब्रुवारी महिन्याचा अंक 'जन्मजात मुक्त' या विषयास वाहिलेला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

**

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# ज्योतीचा जन्म व विकास

## तू परमेश्वर आहेस

(श्रीमाताजी येथे त्यांच्या बालपणीच्या आठवणी सांगत आहेत.)

मी अकरा–बारा वर्षांची होते तेव्हा माझ्या आईने जंगलाच्या कडेला एक छोटेसे घर भाड्याने घेतले होते. मी एकटीच जंगलात जाऊन बसत असे. मी माझ्या विचारांमध्ये गढून जात असे आणि हे असे नेहमीच घडत असे. एके दिवशी काही खारी आल्या, खूप पक्षी आणि एक हरीण आले, इतके सुंदर होते ते हरीण! (श्रीमाताजी डोळे मोठ्ठे करून दाखवितात.) खूपच सुंदर होते. मी डोळे उघडून त्याच्याकडे पाहिले तेव्हा ते उड्या मारत पळून गेले.

कालांतराने म्हणजे, मी वीस बावीस वर्षांची असताना, जेव्हा मि. थिऑन (एक गूढविद्या तज्ज्ञ) यांना भेटले तेव्हा या सर्व गोष्टींच्या स्मृती पुन्हा जागृत झाल्या, म्हणजे त्या स्मृती सुमारे दहा वर्षांनंतर जागृत झाल्या होत्या. मि. थिऑन यांनी या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण करून सांगितले तेव्हा मला त्या साऱ्या गोष्टींचा अर्थ उलगडला. मग मला माझ्या बाबतीत जे जे काही घडले होते ते सारे आठवले. मिसेस थिऑन या देखील गूढविद्या तज्ज्ञ होत्या. मी त्यांना माझ्या बालपणीच्या सर्व गोष्टी सांगितल्या होत्या. तेव्हा मिसेस थिऑन मला म्हणाल्या होत्या की, ''मला माहीत आहे, तू म्हणजे साक्षात तो परमेश्वर आहेस, त्या परमेश्वराची मोहोर तुझ्यावर उमटलेली आहे.'' मग त्या काय म्हणत आहेत याचा मी विचार करू लागले आणि मला आढळले की, त्या जे म्हणत आहेत त्यात तथ्य आहे.

मला हे जे काही अनुभव येत होते ते खात्रीने या गोष्टीचे निदर्शक होते की, अदृश्यातून कोणीतरी माझी काळजी घेत होते. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही काही माझ्या मनाची कल्पना नव्हती; कारण तेव्हा मला अशा गोष्टींच्या अस्तित्वाविषयी (अदृश्य राहून कार्य करणाऱ्या जिवांविषयी)

काहीच माहीत नव्हते, मला ध्यान म्हणजे काय तेही माहीत नव्हते. मात्र ध्यान काय असते हे अजिबात माहीत नसताना देखील मी ते करत असे. मला काहीही माहीत नव्हते, अजिबात माहीत नव्हते कारण माझ्या आईने तो विषयच निषिद्ध ठरविलेला होता, त्या गोष्टींचा विचारदेखील करता कामा नये असा तिचा दंडक होता. कारण त्या गोष्टींमुळे माणसांना वेड लागते, असे तिचे मत होते.

– श्रीमाताजी (Conversation with a Disciple, March 9, 1963)

*

## नास्तिकता आणि ईश्वरी अस्तित्वाचा अनुभव

मला अगदी परस्परविरोधी असे अनुभव आलेले आहेत. केवळ एकच गोष्ट अगदी माझ्या लहानपणापासून अविरतपणे माझ्या सोबत आहे आणि मी त्या गोष्टीकडे जेवढे अधिकाधिक लक्ष देते, तेवढी ती सातत्याने माझ्यासोबत असल्याचे मला जाणवत राहते. ती गोष्ट म्हणजे ईश्वरी अस्तित्व! आणि आश्चर्याची बाब अशी की, ते अस्तित्व अशा व्यक्तीमध्ये (माझ्यामध्ये) जाणवत असे की, जी तिच्या बाह्यवर्ती जीवनात म्हणत असे की, ''देव? छे! हा काय मूर्खपणा लावलाय? देव वगैरे काही अस्तित्वात नसतो.'' अगदी सतत आणि इतक्या प्रभावीपणे हा अनुभव येणे ही एक अद्भुत, अतिशय अद्भुत अशी कृपा असते आणि त्यामुळे ईश्वरी अस्तित्वाचा हा अनुभव इतर साऱ्या साऱ्या गोष्टींच्या तुलनेत वेगळेपणाने उठून दिसतो. माझ्या बाह्यवर्ती जाणिवेचा मात्र देव वगैरे गोष्टींना संपूर्ण नकार होता. नंतरनंतर तर मी असेसुद्धा म्हणत असे, ''जर देव असेलच तर तो खरोखर बदमाश असला पाहिजे. तो म्हणजे एक ब्यादच आहे आणि अशा या आपल्या निर्माणकर्त्याशी मला काहीएक घेणंदेणं नाही.'' माझे असे मत का होते, ते देवाविषयीची पुढील संकल्पना पाहिल्यावर तुमच्या लक्षात येईल. देव शांतपणे तेथे स्वर्गात बसला आहे, त्याने हे विश्व निर्माण केले आहे आणि त्या विश्वाकडे पाहून तो स्वतःचे

मनोरंजन करून घेत आहे आणि म्हणत आहे, ''बघा, मी हे किती सुंदर जग निर्माण केले आहे!'' तेव्हा मी म्हणत असे, ''तर मग या राक्षसाशी मला काहीही घेणंदेणं नाही.''

– श्रीमाताजी (Conversation with a Disciple, April 29, 1961)

*

ईश्वराकडे जाण्याचा माझ्यासाठी असलेला सर्वात सघन मार्ग म्हणजे विशुद्ध प्रेमाचे स्पंदन. हे प्रेम म्हणजे व्यावहारिक प्रेम नव्हे, तर हे 'प्रेम' स्वयंभू असते. आणि तो निश्चितपणे माझ्यासाठी सर्वात सघन मार्ग आहे. पण म्हणून मला इतर मार्गांचे वावडे आहे असे मात्र नाही. माझ्या मार्गामध्ये इतर मार्ग किंवा इतर संपर्क वगळले जात नाहीत तर, त्या मार्गामध्ये इतर सर्व गोष्टी समाविष्ट होतात.

अगदी लहानपणापासून आणि तरुण असतानासुद्धा, माझ्या योगप्रवासाच्या आरंभी, माझ्या व्यक्तित्वामध्ये 'देव' या शब्दाबद्दल एक प्रकारची नकारात्मक भावना होती, त्याचे कारण म्हणजे त्या शब्दाच्या पाठीमागे असलेल्या सर्व मिथ्या गोष्टी. (श्रीअरविंदांनी मला त्या नकारात्मकतेपासून मुक्त केले. त्यांनी मला माझ्या इतर मर्यादांमधून जसे मुक्त केले होते, तसेच त्यांनी या बाबतीत देखील मला मुक्त केले.) पण तरीसुद्धा, अजूनही देव हा शब्द माझ्या मुखात तितक्या सहजतेने येत नाही. पण 'प्रेम'... या शब्दाचा उच्चार होताक्षणीच, तो माझ्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचतो आणि मग त्याच क्षणी आतून काहीतरी उदयाला येते... अर्थात नुसते शब्द महत्त्वाचे नसतात.

– श्रीमाताजी (Conversation with a Disciple, May 31, 1962)

*

## श्रीमाताजींचे मार्गदर्शन व साहाय्य

(श्रीअरविंद यांनी आश्रमाची आणि साधकांच्या आध्यात्मिक प्रगतीची सर्व जबाबदारी श्रीमाताजींवर सोपविली. परंतु जे साधक

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# अभीप्सापूर्ती

एका साधकाने एकदा श्रीमाताजींना विचारले की, ''एखाद्या व्यक्तीने तारा निखळताना पाहिला आणि त्या क्षणी जर तिने एखाद्या गोष्टीची इच्छा व्यक्त केली तर, त्या व्यक्तीची ती इच्छा वर्षभरात पूर्ण होते, असे म्हटले जाते. हे खरे आहे का?''

तेव्हा श्रीमाताजींनी त्यांच्या जीवनातील एक गोष्ट सांगितली. त्या सांगू लागल्या, ''एकदा मी हा प्रयोग केला होता. जेव्हा मी एक तारा निखळताना पाहिला अगदी त्याच क्षणी 'मला ईश्वरी ऐक्याचा साक्षात्कार व्हावा,' ही आस, ही अभीप्सा माझ्या मनामध्ये उदित झाली. आणि खरोखरच, एक वर्ष पूर्ण होण्याच्या आत, ती पूर्ण झाली होती.

पण ही गोष्ट काही त्या ताऱ्यामुळे घडून आली नव्हती. ती घडून आली याचे कारण असे की, माझ्या संपूर्ण चेतनेवर त्या अभीप्सेचेच प्रभुत्व होते आणि मी त्या गोष्टीव्यतिरिक्त अन्य कोणत्याच गोष्टीचा विचार करत नव्हते, मला फक्त त्याच गोष्टीची आस होती, मी सतत त्याच गोष्टीचा विचार करत असे. त्यामुळे, जी गोष्ट प्रत्यक्षात यायला साधारणपणे एक पूर्ण जीवन लागू शकते; अगदी काही नाही तरी किमान तीस-पस्तीस वर्षे लागतात, तीच गोष्ट बारा महिन्यांच्या आत पूर्ण झाली होती.

ती पूर्ण झाली होती याचे कारण म्हणजे मी फक्त त्या आणि त्याच गोष्टीचा सतत विचार करत असे. त्यामुळे ज्या क्षणी मला तो तारा निखळताना दिसला, अगदी त्याच क्षणी माझी ती आस मी शब्दबद्ध करू शकले. ती काही धूसर कल्पना नव्हती, तर ती 'अभीप्सा' मी अगदी नेमक्या शब्दांत मांडू शकले. त्यामुळे, महत्त्व निखळणाऱ्या ताऱ्याला नसून, अभीप्सेला आहे. तो तारा हे केवळ बाह्य निमित्त होते. साक्षात्कार त्वरेने व्हावा यासाठी तारा निखळण्याची काही आवश्यकता नाही. व्यक्तीची सारी अभीप्सा एकाग्र झालेली असली पाहिजे, हीच एकमेव आवश्यक गोष्ट असते.''

– आधारित (CWM 08 : 210-211)

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### २४ नोव्हेंबर २००४

व्यक्तीने ईश्वरावर विसंबून राहिले पाहिजे आणि त्याच बरोबर स्वतःला सक्षम करणारी काही साधनादेखील केली पाहिजे. ईश्वर साधनेचे फल साधनेच्या प्रमाणात नाही तर, जिवाच्या आणि त्याच्या अभीप्सेच्या प्रमाणात प्रदान करतो. (जिवाच्या आणि त्याच्या अभीप्सेच्या प्रामाणिकपणाच्या प्रमाणात म्हणजे मला येथे असे म्हणायचे आहे की, जिवाची ईश्वराविषयी आणि उच्चतर जीवनाविषयी जी तळमळ असते तिच्या प्रमाणात ईश्वर साधनेचे फल प्रदान करतो.)

''मी असा होईन, मी तसा होईन, मी कसे असावे बरे?'' अशा प्रकारच्या चिंता करणे देखील उपयोगाचे नसते. तर असे म्हणावे की, ''मला मी कोण व्हावेसे वाटते यासाठी नव्हे तर, ईश्वराला मी कोण होणे अपेक्षित आहे, तसे होण्यास मी तयार आहे.'' बाकी सर्व गोष्टी त्याच आधारावर झाल्या पाहिजेत.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 55)

*

### ५ डिसेंबर २००४

श्रीअरविंद आपल्यामध्ये नित्य उपस्थित आहेत आणि त्यांना पाहण्याची व त्यांचे ऐकण्याची ज्यांची तयारी झाली आहे त्यांच्यासमोर ते स्वतःला प्रकट करतात.

– श्रीमाताजी (CWM 13 : 11)

*

### १ जानेवारी २००५

हे प्रभो, माझे मन, माझे हृदय, माझा प्राण तुझ्या दिव्य प्रकाशाप्रत, दिव्य प्रेमाप्रत, दिव्य शक्तीप्रत खुला कर. प्रत्येक वस्तुमात्रामध्ये मला ईश्वरच दिसावा, अशी प्रार्थना मी करत आहे.

– श्रीमाताजी (Conversation with the disciple : October 07, 1970)

*